मुंबई ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ नवे विचार...नवी सुरुवात ▪ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक
# हॅलो प्रभात

▪ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ वर्ष : ६ ▪ अंक : १८८ ▪ शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५ ▪ किंमत: ३ रुपये ▪ पाने : ४+२




## संक्षिप्त...

### रोटरी क्लब ऑफ सांगली तर्फे वृक्षारोपण

**सांगली : हॅलो प्रभात**



रोटरी क्लब ऑफ सांगली व समाजसेविका रो.डॉ.रतन पाटील यांच्या वतीने ८० फुटी रस्ता येथे १६ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले रोटरी क्लबचे सेक्रेटरी रो.डॉ.अभिजित उदगावकर व महापालिका उद्यान अधिक्षक अजित गुजराथी यांच्या हस्ते रोपे लावून शुभारंभ झाला. मुचकूंद, रीठा, बेहडा, कुसूम, सीता अशोक, अर्जून, बहावा, चाफा, बेल, कांचनार, पळस अशा भारतीय झाडांची लागवड करण्यासाठी वनस्पती अभ्यासक रोहन पाटील यांनी सहकार्य केले.

# नागपुरात ‘कन्व्हेन्शन सेंटर’ उभारण्यात येणार

## देवेंद्र फडणवीस ; फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य करार

**मुंबई : हॅलो प्रभात**

नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे ’ कन्व्हेन्शन सेंटर’ उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला.

नागपूरला उभारण्यात येणारे ‘+कन्व्हेन्शन सेंटर’ साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

यावेळी स्पेनचे भारतातील राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी उपयोगात येणारे नसावे, तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास ’कन्व्हेन्शन सेंटर’ च्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे.

स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत असून याची दखल जगाने घेतली आहे. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे ’पावर हाऊस’ बनत आहे. त्यामुळे मुंबई राजधानी असलेल्या महाराष्ट्रसोबत नक्कीच स्पेनला काम करायला आवडेल, अशा शब्दात त्यांनी महाराष्ट्राचा गौरव केला. फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो यांनी सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी नागपूर आणि फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

# ‘लोकांना’ नाद लागलाय कर्जमाफीचा ; दादांच्या मंत्र्याचं वादग्रस्त वक्तव्य

**मुंबई : हॅलो प्रभात**

### विरोधकासह आणि सत्ताधाऱ्यांनी देखील केली टीका

आम्हाला निवडून यायचं असतं, त्यामुळे आम्ही निवडणुकीत काहीतरी आश्वासन देत असतो. लोकांना कर्जमाफीचा नाद लागलाय. लोकांनी ठरवायला पाहिजे की नेमकं काय मागायचं, असे वादग्रस्त वक्तव्य राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. त्यांच्या या विधानानंतरशेतकरीनेते, विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनीदेखील टीका केल्यानंतर त्यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली.



महायुतीच्या नेत्यांनी ताळतंत्र सोडलाय अशी टीका माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे.

कर्जमाफीवरून बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या विधानानंतर त्यांच्याच पक्षाचे मंत्री छगन भूजबळ यांनी घरचा आहेर दिला. भूजबळ म्हणाले की, नाद लागणं असं बोलण हे आमच्या नेत्याचे चुकीचं विधान आहे. अजितदादा याकडे लक्ष घालतील. कोण काय बोलतं, या सगळ्याकडे त्यांच लक्ष असतं, असं ते म्हणाले.

राजू शेट्टी यांनी बाबासाहेब पाटील यांच वक्तव्य दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. लातूर हा निसर्गावर अवलंबून शेती करणारा जिल्हा आहे. येथे मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. अशा भागातून येणाऱ्या बाबासाहेब पाटलांसारख्या तळागाळातल्या माणसाचं वक्तव्य म्हणजे सत्तेची झूल चढल्यानंतर डोळ्यांवर आलेल्या धुंदीचा प्रकार आहे. सोयाबीनचा भाव खाली गेला असताना उत्पादन खर्च वाढत आहे.

शेतकरी कर्जबाजारी झाला झाल्याने आत्महत्या करत आहेत. याला नाद लागलाय म्हणायचं का? निवडणुकीत मतं घेण्यासाठी आश्वासन द्यावी लागतात, अस वक्तव्य संतापजनक आहे. महायुतीच्या सर्वच नेत्यांनी ताळतंत्र सोडला आहे. जनता त्यांना त्यांची जागा दाखवेल, असे शेट्टी यांनी म्हटले आहे.

# शिंदेसेनला रोखण्याचा ‘ठाकरे’ सेनेचा प्रयत्न

**मुंबई : हॅलो प्रभात**

### धनुष्यबाण चिन्हच गोठविण्याची मागणी शक्य

शिवसेनेच्या निवडणूक चिन्हा संदर्भात १२ नोव्हेंबर रोजी सुनावणी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शिंदेसेनेला धनुष्यबाण चिन्हाचा वापर करता येऊ नये म्हणून हे चिन्हच गोठविण्याची मागणी ठाकरेसेनेकडून र्सर्वोच्च सर्वोच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असतानाच , शिवसेना आमदारांच्या अपात्रतेबाबत, तसेच पक्ष व चिन्ह कोणाचे याबाबत निकाल महापालिका निवडणुकीच्या पूर्वी येण्याचे संकेत आहेत.

यात धनुष्यबाण चिन्ह हे शिंदे गटाला न देता ते गोठविण्यात यावे, अशी मागणी ठाकरे गटाकडून होणार आहे, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत शिंदे गट धनुष्यबाणावर लढणार



की चिन्ह गोठविले जाणार? असा प्रश्न उभा राहणार आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडून वेगळा गट स्थापन केल्यानंतर या विरोधात उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे.

१२ नोव्हेंबरपासून दोन–तीन दिवसांची सुनावणी होऊन अंतिम निकाल येईल, असे ठाकरे आणि शिंदे अशा दोन्ही गटांकडून सांगितले जात आहे. पण आमदार अपात्रतेच्या निकालात आता कुणाला फारसा रस राहिलेला नाही. मात्र शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाकडे जाणार की चिन्ह गोठविले जाणार याबाबत उत्कंठा आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर एकनाथ शिंदे यांनी, लोकसभा आणि विधानसभा २०२४ च्या निवडणुका लढवल्या. त्याचा फायदा शिंदे गटाला झाला.

त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्हावर लढविण्याचा शिंदे यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे ठाकरे गटाला आता शिवसेना पक्ष हे पुन्हा मिळावे , यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पण त्यांना धनुष्यबाण या चिन्हात रस नाही.

कारण त्यांचे मशाल हे चिन्ह घराघरात पोचले आहे. लोकसभा निवडणुकीत चांगले यश ठाकरे गटाला मिळाले. पण धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाकडे राहिले तर त्याचा फायदा शिंदे गटाला मिळेल त्यामुळे हे चिन्ह गोठविण्यासाठी ठाकरे गटाची तयारी आहे.

निवडणूक चिन्ह गोठविण्याचा अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय निवडणूक चिन्हाबाबत निर्णय घ्या, असे निवडणूक आयोगाला आदेश देवू शकते.

त्यानंतर ठाकरे गट धनुष्यबाण चिन्ह गोठविण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे अर्ज करणार आहे.

# सह्याद्री देवराई पुरस्कृत विजयमाला कदम बीजतुलेतील बीजांचे रोपण

**सांगली : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठ आणि सह्याद्री देवराई या अग्रगण्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने विजयमाला पतंगराव कदम यांच्या अमृत महोत्सवाच्या औचित्याने देववृक्ष व औषधी वनस्पतींच्या बीजतुलेतील बीजांचे रोपण डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात



करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विवेक रणखांबे यांच्या हस्ते झाले. त्यांनी ’बीजक’ या वृक्षाचे बीजारोपण करताना सांगितले की, भारतीय संस्कृतीमध्ये वृक्षवल्लीचे स्थान अनन्यसाधारण आहे, आणि या उपक्रमातून निसर्ग संवर्धनाचा मोलाचा संदेश दिला जात आहे.

‘बीजक’ या झाडाच्या लाकडाचा वापर प्राचीन काळी पाणी साठवण्यासाठी व भांडी तयार करण्यासाठी होत असे. या लाकडामध्ये पाण्याचे औषधी गुण वाढवण्याची क्षमता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमावेळी उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. ए. एल. जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली कांबळे, प्रा. आर. एस. काटकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# द्राक्ष बागांना नुकसान भरपाई मिळणार

**तासगाव : हॅलो प्रभात**

### संजयकाका पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

तासगाव–कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे द्राक्ष बागांचे मोठे नुकसान झाले असताना, या नुकसानीच्या पंचनाम्यांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी अखेर दूर झाल्या आहेत. माजी खासदार संजय पाटील यांच्या तातडीच्या पाठपुराव्यानंतर केंद्र सरकारने त्वरित आदेश निर्गमित केल्याने, आता नुकसानग्रस्त द्राक्ष बागांचे पंचनामे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याची आशा वाढली आहे. दरम्यान तासगाव येथे अधिकाऱ्यांच्या विशेष



आयोजित बैठकीत संजय काका यांनी शेतकऱ्यांच्या पंचनामा बाबत आहे.

हयगय केलेली खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा दिला या बैठकीला प्रांताधिकारी उत्तम दिघे तहसीलदार अतुल पाटोळे तालुका कृषी अधिकारी अनिल फोंडे सहाय्यक बिडीओ गावडे उपस्थित होते.द्राक्ष हे नगदी पीक असून, त्याचे झालेले प्रचंड नुकसान आहे मात्र काही तंत्रिक अडचणीमुळे त्याला नुकसान भरपाई मिळण्यासाठी अडचणी होत्या, पाटील यांनी तातडीने दिल्ली दरबारी धाव घेतली. त्यांनी थेट केंद्रीय कृषी राज्यमंत्री यांच्याशी संपर्क साधून द्राक्ष पंचनाम्यातील अडचणींची माहिती दिली. द्राक्ष संशोधन केंद्राच्या तपासणीत नुकसानीचे प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक स्पष्ट झाले होते. मात्र, पंचनाम्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींमध्ये येत असलेल्या अडथळ्यांमुळे पंचनाम्याचे काम थांबले होते. या यशस्वी पाठपुराव्यानंतर तासगाव येथे घेतलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत संजय पाटील यांनी खरीप पिकांसोबतच द्राक्ष व ऊस पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. केंद्राच्या आदेशामुळे आता द्राक्ष बागांच्या पंचनाम्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले असून, तातडीने प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही पाटील यांनी केले आहे.




# राष्ट्रवादी (अ.प.) पक्षाची जिल्हा (ग्रामीण) ची कार्यकारणी जाहीर

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांगली जिल्हा (ग्रामीण) च्या जिल्हा कार्यकारणीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी चे प्रदेश सरचिटणीस आ.शिवाजीराव गर्जे यांनी नुकतीच मंजुरी दिली असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सांगली जिल्हा (ग्रामीण) चे जिल्हा अध्यक्ष, निशिकांत भोसले–पाटील यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सांगली जिल्हा (ग्रामीण) चे जिल्हा अध्यक्ष, निशिकांत भोसले–पाटील म्हणाले, सांगली जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या विचाराने व राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. येणाऱ्या स्थानिकच्या निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी हा पक्ष एक नंबरला राहील. या दृष्टीने निवडणुकांना आम्ही सामोरे जात आहोत. राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री ना. अजितदादा यांची जनतेविषयी असलेली कार्यतत्परता यासाठी विशेष प्रयत्न करतील असा मला विश्वास आहे.






## अमिताभ यांची 'अँग्री यंग मॅन' जनमानसात प्रतिमा

हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन... अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले, पण तिथे त्यांचे मन रमले नाही. तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८३ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही.

# कामाच्या तणावातच जातंय निम्म आयुष्य..!

**हॅलो प्रभात**

स्पर्धात्मक जीवनामुळे नोकरदारांची धावपळ दसपटीने वाढलीय. या धावपळीचा ताण शरीरावर तर येतोच, पण मानसिक ताणातही कित्येक पटीने भर पडते. आज मिटींग, उद्या प्रेझेंटेशन अशा सर्वच प्रकारच्या तणावातून आपण दररोज जात असतो.घरच्या टेंशनसोबत लढत असताना कामाचं टेंशन एवढं वाढतं की, त्यातून कधी-कधी वेळही मिळत नाही. कालच दि. १० रोजी 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' साजरा झाला. यानिमित्त 'डब्लूएचओ'ने 'कामाच्या ठिकाणचं मानसिक स्वास्थ' कसे राखावे याबद्दल दिलेली माहिती...




जगभरातील मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल कमी असलेली जागरुकता वाढवण्यासाठी व ज्यांना मानसिक आजार आहे, त्यांच्याकडे कामाच्या ठिकाणी बघण्याचा दृष्टीकोन पाहता आपण यावर वेळीच योग्य उपचार केला नाही किंवा संवाद साधला नाही, तर खालील कारणांमुळे हा आजार कायमस्वरूपी आपल्या मनावर ताबा मिळवू शकतो.

### कोणकोणत्या गोष्टींमुळे येतो मानसिक ताण

**● कमी पगार व कामाचा जास्त ताण ● प्रगतीसाठी कमी संधी ● मनाला हवं तसं काम न करता येणं ● नोकरीसंदर्भात घेतल्या जाणाऱ्या निर्णयावर नियंत्रण नसणं ● कामासंदर्भातील काम देणाऱ्यांच्या पगारवाढीविना वाढत्या मागण्या, अपेक्षा.**

### डॉक्टरांनाही येतो मानसिक ताण



मानसिक तणावापासून खुद्द डॉक्टरही वाचलेले नाहीत. रोज सकाळी ८ वाजल्यापासून त्यांचं दैनंदिन आयुष्य सुरू होतं. सतत दोन-दोन दिवस डॉक्टर काम करतात. एखादं इमर्जन्सी ऑपरेशन असेल, तर त्यातही मागे-पुढे न बघता ते ती परिस्थिती हाताळतात. डॉक्टरांच्या मानसिक तणावाविषयी केईएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे यांच्याशी बातचित केली असता त्यांनी बऱ्याच बाबी स्पष्ट केल्या. डॉक्टरांना सर्वात जास्त ताण असतो तो म्हणजे क्लिनिकल प्रॅक्टिसचा. त्यानंतर, एखादा रुग्ण उपचारांसाठी दाखल झाल्यानंतर तो बरा होईपर्यंत किंवा त्याला येणाऱ्या अडचणी या सर्व परिस्थितीला डॉक्टरांना सामोरं जावं लागतं. एका वेळी १०० गोष्टींचा विचार डॉक्टर करत असतात. रुग्णाच्या नातेवाईकाला जेवढा ताण येतो, तेवढाच ताण डॉक्टरांवर येतो. बऱ्याचदा डॉक्टरांना आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवता येत नाही. यातूनही त्यांची चिडचिड होते.

### 'पोलिस अधिकारी व पोलिसही जगतात तणावाखाली'?



पोलिसांनाही मोठ्या प्रमाणात कामाचा तणाव असतो. मग, ते खाकी वर्दीतील असोत किंवा ट्रॅफिक पोलिस असोत. पोलिसांसाठी २४ तास अलर्ट राहून काम करणं हेच सगळ्यात मोठं कर्तव्य असतं. याविषयी माजी सह पोलीस आयुक्त सुधाकर सुराडकर यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी पोलिसांमध्ये कशा प्रकारचे ताण असतात? याचं स्पष्टीकरण दिलं की, जर एखाद्या पोलीसाला भ्रष्टाचार करण्याची सवय असेल आणि त्यातून पैसे खायचे असतील, तर त्याला त्यामधूनही मानसिक ताण येऊ शकतो. पोलिसांमध्येही ३ प्रकार असतात. भ्रष्टाचारी, प्रामाणिक आणि तिसरे म्हणजे परिस्थितीनुसार वागणारे. त्यामुळे आपण आपलं काम कशा पद्धतीने करतो हे सर्वात महत्त्वाचं आहे. पोलिसांना मानसिक तणाव असतो यात शंका नाही. पण, तो कुठल्या आणि कशा प्रकारचा आहे? हे स्वत: पोलिसांनी तपासून बघितलं पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

### *पत्रकार म्हणजे २४ तास ऑन ड्यूटी...*

पूर्वीची आणि आताची पत्रकारिता पाहाता यामध्ये बराच बदल झालेला आढळतो. पूर्वी वृत्तपत्रे मर्यादित होती. काम जरी संथ असले, तरी त्याचा तेवढा ताण पडत नव्हता. पण, आता पद्धत पूर्णपणे बदलली. बातम्या पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी टीव्ही आणि वेबसाईट्स एवढ्या आहेत की प्रत्येक क्षणाला अपडेट रहावं लागतं. त्यामुळे कदाचित आताच्या पत्रकारांना मानसिक तणाव जास्त आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. याच बदललेल्या पत्रकारीतेतील तणावाविषयी ज्येष्ठ पत्रकार योगेश त्रिवेदी यांच्याशी बातचित केली असता, त्यांनी पत्रकारांवरच्या ताणाविषयी भूमिका मांडली. सगळ्याच गोष्टी वेळेत सुरू झाल्या पाहिजेत आणि त्या वेळेत संपल्याही पाहिजेत हा समज असतो.



आजचा जमाना ब्रेकिंग न्यूजचा आहे. स्पर्धा वाढली आहे. मी बातमी देण्याआधी कोणी ती बातमी देऊ नये याचा प्रचंड ताण असतो. शिवाय ती बातमी १०० टक्के खरी असली पाहिजे, याचाही ताण असतो. त्यामुळे पत्रकारांना २४ तास कान-डोळे उघडूनच काम करावं लागतं. एवढं काम करुनही जर वेळेवर पगार होत नसेल तर त्याचा ही मानसिक ताण येतो. *मानसिक तणाव हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक भाग आहे. त्यासाठीच आपणच आपले मानसिक स्वास्थ टिकवणे महत्त्वाचे..!*

शरीर आणि मन ही मानवी जीवनाची दोन्ही अंगे व्यवस्थित असतील तर व्यक्ती व्यवस्थित काम करू शकते. घरात, प्रवासात, आप्तेष्टांमध्ये वावरताना ती आत्मविश्वासाने वावरु शकते. मात्र यापैकी एखाद्या ठिकाणीही अडथळा येत असेल तर त्याचा मनःस्थितीवर आणि मग पर्यायाने वर्तनावर आणि एकूणच कामावर, नातेसंबंधांवर परिणाम दिसून येतात. सर्वांना आनंदी राहण्याचा अधिकार आहे हे तत्व जगातील सर्वच समाजांमध्ये व सर्व स्तरांत रुजण्याची आवश्यकता आहे. १० ऑक्टोबर हा दिवस मानसिक आरोग्य दिन म्हणून समजला जातो. यंदा कामाच्या ठिकाणचे मानसिक आरोग्य अशी संकल्पना घेऊन या दिवशी विविध कार्यक्रमांचे आणि व्याख्यानांचे आयोजन जगभरात केले जात आहे. वर्ल्ड मेंटल हेल्थ फेडरेशन या दिनाचे आयोजन आणि प्रत्येक वर्षाच्या संकल्पनेची निवड करत असते. कामाच्या ठिकाणी असणारे मानसिक आरोग्य व्यक्तींमधील परस्पर संबंध आणि कामाचा ताण यावर अवलंबून असते. यातील प्रत्येक बाबीचा आपल्या कामाच्या जागी वर्तनावर व कामावर परिणाम होत असतो. वर्ल्ड मेंटल हेल्थ फेडरेशनने यंदा ही संकल्पना निवडण्यामागे हेच कारण आहे. या संकल्पनेद्वारे कामाच्या ठिकाणी येणारे तणाव दूर करण्यासाठी प्रयत्न व प्रत्येक कर्मचाऱ्यानं आपल्या प्रश्नांबाबत खुलेपणाने इतरांशी बोलणे अपेक्षित आहे. फेडरेशनच्या मते १० कर्मचाऱ्यांपैकी ६ कर्मचारी आपल्या मानसिक स्थितीची माहिती इतरांपासून लपवत राहतात.

सिल्व्हर रिबन या सिंगापूरमधील एनजीओच्या निरिक्षणां-नुसार, कार्यालयातील २३.४ टक्के कर्मचारी आपल्या मानसिक स्थितीबद्दल कधीही तोंड उघडत नाहीत कारण त्यांना आपली नोकरी जाण्याची भीती वाटत असते तर माझी स्थिती इतरांना समजणारच नाही असा ग्रह १२.८ टक्के लोक करुन घेतात आणि या कारणांमुळे ते कधीच आपल्या प्रश्नांबाबत, भीतीबाबत आणि मानसिक आरोग्याबाबत बोलत नाहीत. मेंटल हेल्थ फाऊंडेशन या संस्थेने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार ६५ टक्के लोक कामाच्या ठिकाणी घाबरलेले असतात, आपल्या वरिष्ठांशी मानसिक आरोग्याबाबत बोलायला त्यांना भीती वाटत असते. तसेच एक तृतियांश लोकांना मानसिक प्रश्न त्रास देत असतात आणि त्याबाबत ते कधीही जवळच्या व्यक्तीशी किंवा आप्तेष्टांशी बोलत नाहीत असेही या संस्थेच्या निरीक्षणातून दिसून आले आहे. बहुतांश लोकांनी आपण मानसिकदृष्ट्या खचलेल्या व्यक्तीला कामावर ठेवणे पसंत करणार नाही अशी माहिती निरिक्षणांत नोंदवली आहे. यामुळेच कामाच्या ठिकाणी खुलेपणा असणे, मानसिक प्रश्न किंवा काळजी या मुद्द्यांवर वरिष्ठांशी बोलणे, कार्यालय व कर्मचारी यांच्यामध्ये संवादाचा वेगळा दुवा स्थापन करणे असे उपाय कंपन्यांनी करावेत, असे उपाय तज्ज्ञ सुचवतात.

## मोतीलाल ओसवाल फाउंडेशनने पुरग्रस्थांसाठी मदत केली जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

मोतीलाल ओसवाल फाउंडेशनने महाराष्ट्रातील पूरग्रस्त मराठवाडा भागातील मदत कार्यांसाठी ५० लाख देण्याची घोषणा केली आहे. याशिवाय, फाउंडेशनने ग्रुपच्या कर्मचाऱ्यानी केलेल्या देणग्यांना १:१ प्रमाणात जोडण्याचे वचन दिले आहे. ङ्गग्लोबल विकास ट्रस्ट फंडङ्घ आपदग्रस्तांना आणि शेतकऱ्यांना सक्रियपणे रकमेचे वितरण करेल आणि पूरग्रस्त नागरिकांना आवश्यक असलेली मदत पोहोचवेल. आपली वैयक्तिक बांधिलकी जाणून, मोतीलाल ओसवाल फाउंडेशनचे ट्रस्टी रामदेव अग्रवाल आणिी सुनीता अग्रवाल यांनी मयंक गांधी यांच्या ग्लोबल विकास ट्रस्ट मधील आपल्या सहकाऱ्यांसोबत मराठवाड्याला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि तातडीने मदत कार्य सुरू केले. या उपक्रमाच्या माध्यमातून, फाउंडेशन आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखीत करते, आणि संकटाच्या क्षणांत सहानुभूतीपूर्वक ग्रामीण भागाच्या उत्थानात दूरदृष्टीने, दीर्घकालीन गुंतवणूक करते.

## बिटसॉम टेस्ट फॉर ऑनलाइन प्रोग्राम्सच्या लाँचची घोषणा

**मुंबई : हॅलो प्रभात**



बिटसॉमने मसाईसोबत सहयोगाने ऑल इंडिया बिटसॉम टेस्ट फॉर ऑनलाइन प्रोग्राम्स (टॉप-२०२५) च्या लाँचची घोषणा केली आहे. ही देशव्यापी ऑनलाइन परीक्षा विद्यार्थ्यांना व्यवसाय व तंत्रज्ञानामधील विविध व्यावसायिक प्रोग्राम्सकरिता पात्र ठरण्यास आणि त्यामधून निवड करण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. १२ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणारी ही परीक्षा गुण-आधारित कोर्स निवड मॉडेलला सादर करेल, जो विद्यार्थ्यांना विभागातील कामगिरीवर आधारित त्यांचा पसंतीचा प्रोग्राम निवडण्याची सुविधा देतो. या उपक्रमाचा एकमेव मूल्यांकन प्रवेश आणि वैविध्यपूर्ण अध्ययन मार्गांना एकत्र करत व्यवस्थापन व तंत्रज्ञान शिक्षणाला अधिक सहजसाध्य आणि स्थिर करण्याचा मनसुबा आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन



**नवी मुंबई : हॅलो प्रभात**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीनवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन केले. हा देशातील सर्वात महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांपैकी एक असून भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रातील एक निर्णायक टप्पा ठरला आहे. या प्रसंगी पंतप्रधान म्हणाले, 'मुंबईचा अनेक वर्षांचा प्रतिक्षेचा क्षण आज पूर्ण झाला आहे. आता मुंबईला तिचा दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळाला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संपूर्ण या परिसराला आशियातील सर्वात मोठा कनेक्टिव्हिटी हब बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

## फोनपे पेमेंट गेटवे,रूपे आणि जिओ हॉटस्टार यांचा सहयोग

**मुंबई : हॅलो प्रभात**




ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये, फोनपे पेमेंट गेटवेने जिओ हॉटस्टारच्या सहयोगाने, रुपे क्रेडिट कार्डवरील युपीआय ऑटोपेवर आधारित 'सबस्क्रिप्शन आयक्यू' च्या प्रारंभाची घोषणा केली. या निर्णयामुळे फोनपे पेमेंट गेटवेला रुपे क्रेडिट कार्डद्वारे समर्थित युपीआय ऑटोपे मॅन्डेट्स प्रदान करता येतील, ज्यामुळे ग्राहकांना रिकरिंग पेमेंट व्यवस्थापित करण्याचा एक विश्वासार्ह आणि सोयीस्कर मार्ग मिळेल. पारंपारिकपणे, युपीआय ऑटोपे मॅन्डेट्स थेट बँक खात्यांशी जोडलेले होते, ज्यामुळे डेबिटच्या तारखेला खात्यात कमी शिल्लक असल्यास पेमेंट अयशस्वी होऊ शकत होते. आता रुपे क्रेडिट कार्डवर युपीआय ऑटोपे सक्षम केल्यामुळे, ग्राहकांना त्यांचे सबस्क्रिप्शन क्रेडिट लाइनद्वारे करण्याची लवचिकता मिळते. जिओ हॉटस्टार सारख्या सेवांचा अखंडित वापर सुनिश्चित होतो.

## 'इंडस्ट्री रेडी' लेक्चर सिरीजला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सांगली : हॅलो प्रभात**

चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स आणि टी. बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'How to be Industry Ready?' या विषयावरील १२ दिवसीय लेक्चर सिरीजचा समारोप उत्साहात झाला. १५ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या या सिरीजला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद लाभला.

**चिंतामणराव कॉलेज व टी.बी.लुल्ला फाउंडेशनचा उपक्रम**



या मालिकेत उद्योगजगत, शिक्षण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील नामांकित व्याख्याते सहभागी झाले. या सिरीजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, करिअर संधी, प्रॅक्टिकल ज्ञान आणि उद्योगजगताची ओळख मिळाली. समारोप प्रसंगी CDC अध्यक्ष रवींद्र ब्रम्हनाळकर यांनी उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले, तर प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार यांनी आभार मानले. ॲड. किशोर लुल्ला यांनी हा उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

समन्वयक प्रा. स्वप्ना उदगांवकर, प्रा. सुप्रिया सूर्यवंशी, डॉ. विजय साळुंके आणि अनूप कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले. नारायण आपटे व डॉ. आशिष पुराणिक यांनी मोलाचा वाटा उचलला. सहभागी विद्यार्थ्यांना कॉलेज व फाउंडेशनच्या वतीने प्रमाणपत्रे देण्यात आली.

## एक्मे ग्रुपने उत्पादन पोर्टफोलिओ आणि नेतृत्व केले मजबूत

**गुरुग्राम : वृत्तसंस्था**



भारतातील आघाडीची अक्षय ऊर्जा कंपनी, एक्मेने त्यांचा अक्षय उपकरणे उत्पादन व्यवसाय चालविण्यासाठी एक्मे ग्रुपमध्ये एक स्वतंत्र युनिट स्थापन केले आहे. कंपनीने जयपूरमध्ये २३० कोटी गुंतवणुकीसह १.२ गिगावॅट वार्षिक क्षमतेचा सौर मॉड्यूल उत्पादन युनिट स्थापन केला आहे. त्यांच्या व्यवसाय वाढीच्या योजनांचा एक भाग म्हणून, एक्मे ग्रुपने जितेंद्र अग्रवाल यांची उत्पादन व्यवसायाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करून त्यांचे व्यवसाय नेतृत्व मजबूत केले आहे.

## एचडीएफसी बँके तर्फे 'माय बिझनेस क्युआर'ची सुरुवात

**मुंबई : हॅलो प्रभात**



एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे आज त्यांच्या माय बिझनेस क्युआरची सुरुवात करत असल्याची घोषणा ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये केली. माय बिझनेस क्युआर हा छोट्या व्यावसायिकांसाठी विशेष असा भारतातील पहिला कॉमर्स आयडेंटिटी क्युआर आहे. या क्युआरची सुरुवात ही बँकेच्या स्मार्ट हब व्यापार या प्रसिध्द ॲपची पुढची पायरी म्हणून व्यापारीफाय च्या सहकार्याने करण्यात आली असून स्मार्टहब व्यापारचे आधी पासूनच देशभरांतील २ दशलक्षांहून अधिक व्यापारी वापर करत आहेत.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर    ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



## थोडक्यात...

### नव कृष्णा व्हॅली स्कूलचा सेपक टकरा स्पर्धेत विजय



सांगली : हॅलो प्रभात

सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यामार्फत रॉयल अक्॑डमी, खंडेराजुरी येथे ९ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या शालेय जिल्हास्तरीय सेपक टकरा स्पर्धेत नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यम, कुपवाडच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत शाळेने १४ व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक, तसेच १९ वर्षाखालील गटात द्वितीय क्रमांक पटकावला. खेळाडूंना अशरफ शेख क्रीडा प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर सराव करण्यात आला. अतिशय चुरशीच्या लढतींमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट संघभावना आणि कौशल्य दाखवत विजय मिळवला. या खेळाडूंना सुरज फाउंडेशनचे अध्यक्ष प्रवीण लुंकड , डायरेक्टर संगीता पागनीस, उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, स्पोर्ट्स इन्चार्ज विनायक जोशी आणि क्रीडा शिक्षक सुशांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा आहे. नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यमच्या या उल्लेखनीय यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## 'नेहरू हायस्कूल'चा खो-खो संघ तालुक्यात विजयी!



### जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड

कोतोली : हॅलो प्रभात

कोतोली (ता.पन्हाळा) येथे झालेल्या शासकीय तालुका स्तरीय १७ वर्षाखालील खो-खोस्पर्धेत नेहरू विद्यामंदिर आणि ज्युनिअर कॉलेज, कोतोलीच्या संघाने अव्वल कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे नेहरू हायस्कूलच्या संघाची जिल्हास्तरीय खो-खोस्पर्धेसाठी निवड झाली असून, खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय, गती आणि जिद्दीच्या बळावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. संघाच्या यशामागे संस्थेचे अध्यक्ष अरुण नरके, उपाध्यक्ष चंद्रदीप नरके, विश्वस्त अजित नरके, मुख्याध्यापक पी. एस. पोर्लेकर, क्रीडा शिक्षक आर.जी.कांबळे, तसेच बाजीराव फिरींगे, दीपक पाटील, एस.डी.पाटील, अरुण सावंत आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या वतीने विजयी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

## शेतीपूरक व्यवसाय म्हणजे रोजगारनिर्मितीचे मोठे साधन : नेताजीभाऊ खंडागळे



### सह्याद्री फाउंडेशन व श्री महालक्ष्मी संस्थेतर्फे स्वावलंबन उपक्रम

मोडनिंब : संतोष पांढरे

ग्रामविकास आणि ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने सह्याद्री फाउंडेशन आणि श्री महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कुक्कुटपालन, शेळीपालन, पशुसंवर्धन व शिवणकाम या विषयांवरील प्रशिक्षण शिबिर नुकतेच गंगेवाडी येथे यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचा समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष नेताजीभाऊ खंडागळे, ग्रामपंचायत सरपंच प्रशांत जाधव, तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या माध्यमातून गावातील युवक-युवतींनाशेतीपूरक व्यवसायाची माहिती, पशुपालन व शिवणकाम यातील नवनवीन तंत्रज्ञान, तसेच स्वावलंबनाचे धडे देण्यात आले. यावेळी नेताजीभाऊ खंडागळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीचे मोठे साधन म्हणजे शेतीपूरक व्यवसाय. गावातील तरुणांनी सरकारी योजना आणि प्रशिक्षणांचा लाभ घेत स्वबळावर उभे राहणे गरजेचे आहे. सह्याद्री फाउंडेशन अशा उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्येक गावात स्वावलंबनाची चळवळ उभी करेल. या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील युवक-युवतींना रोजगार, आत्मनिर्भरता आणि सामाजिक प्रगतीचा मार्ग उपलब्ध होत आहे. सह्याद्री फाउंडेशन आणि श्री महालक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे गंगेवाडी हे गाव स्वावलंबी गाव या दिशेने वाटचाल करत असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

## पुणे जिल्हा संस्थेच्या उपाध्यक्षपदी प्रमिलाताई गायकवाड

पुणे : हॅलो प्रभात



संस्थाचालक शिक्षण मंडळ, पुणे जिल्हा या संस्थेची नुकतीच सर्वसाधारण सभा पार पडली. यामध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस मा.प्रमिलाताई गायकवाड यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. या सभेत २१ जणांचे कार्यकारी मंडळ बिनविरोध निवडून आले. अध्यक्षपदी विजयराव कोलते, उपाध्यक्षपदी प्रमिलाताई गायकवाड व अनिल मेहेर, सचिव पदी ड.संग्राम कोंडे देशमुख, खजिनदारपदी महेश ढमढेरे व सहसचिव पदी वीरसिंह रणसिंग यांची एकमताने बिनविरोध निवड झाली. या संस्थेमार्फत नवीन शिक्षक व शिक्षकेतर भरती बरोबरच विद्यार्थ्यांना गुणवत्ताधारक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाईल. ज्या शिक्षण संस्थांना प्रशासकीय अडचणी येतील अशा संस्थांना मार्गदर्शन करणे. शिक्षण संस्थांना भौतिक सुविधा, प्रशासकीय बाबी व गुणात्मक विकास करण्यासाठी संस्था प्रभावीपणे कार्य करणे. संस्थाचालक शिक्षण मंडळ हे नवीन शैक्षणिक धोरणानुसार सर्वांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच शिक्षकांचे प्रश्न राज्य शासनाकडून सोडवण्यासाठी प्रयत्न करेल.संस्थांचे असणारे अनेक प्रश्न राज्य शासन व शिक्षण विभागाच्या प्रमुखांशी चर्चा करून सोडवण्यात राहील अशी या कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रसंगी ग्वाही दिली. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या ,शाहू कॉलेज येथील सभागृहात कार्यकारी मंडळाची सभा पार पडली.

या सभेचे प्रास्ताविक ड. प्रदीप वळसे पाटील तर आभार ड. संग्राम कोंडे देशमुख यांनी मानले. यावेळी कार्यकारिणीवर संचालक म्हणून निवड झालेले ड.देवेंद्र बुट्टे पाटील,संग्राम मोहोळ, गणपत बालवडकर, डॉ. प्रसन्नकुमार देशमुख, प्रा.नंदकुमार निकम, महादेव कांचन, संदीप कदम, सौ.जयश्री पलांडे, शिवाजी खांडेकर, भाऊसाहेब ढमढेरे, प्रवीण भोसले, अजित वडगावकर, डॉ. राजेंद्र कांबळे, नंदकुमार शेलार व सल्लागार मंडळाचे अध्यक्ष वि.ल.पाटील व सदस्य उपस्थित होते.

## 'आदर्श' च्या श्रावणी दोरकरची धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड



कोल्हापूर : हॅलो प्रभात

सातारा येथे विभागस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये आदर्श गुरुकुल विद्यालय व जुनि. कॉलेज पेठ वडगाव या प्रशालेतील १९ वर्षा खालील मुलींमध्ये कु.श्रावणी विजय दोरकर या विद्यार्थ्यीने फिटा या प्रकारात चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.डी.एस.घुगरे, संस्थेच्या सचिव तथा मुख्याध्यापिका सौ.एम.डी.घुगरे,प्रशालेच पर्यवेक्षक एस.जी.जाधव,प्रशासक एस.ए. पाटील जिमखाना प्रमुख एन.ए.कुपेकर,एस.एस मदने, प्रशिक्षक आर.के. डोंबे यांचे मार्गदर्शन लाभले .

## फळप्रक्रिया उद्योगातून जिल्ह्याचा ब्रँड निर्माण करावा : जिल्हाधिकारी

सांगली : हॅलो प्रभात

जिल्ह्यातील फळांवर प्रक्रिया करून सांगली जिल्ह्याचा एक ब्रँड निर्माण करावा. त्यासाठी शासकीय योजनांची मदत घ्यावी. चांगल्या दर्जाचे प्रक्रियायुक्त पदार्थ ग्राहकांना देण्याच्या उपक्रमाला सदैव पाठिंबा राहील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले. कुपवाड येथील पियुष कॅनिंग अँड फ्रुट प्रोसेसिंग युनिट येथे फळे व कृषि मालावरील मूल्यवर्धनाच्या संधी व महत्त्व आणि महिला बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या नवीन संधी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी कुंदन शिनगारे, युनिटच्या प्रमुख मीनल भोसले व प्रतापराव भोसले, प्रतापराव पाटील, बचत गटातील महिला व नागरिक उपस्थित होते.

## चिमणभाऊ डांगे यांना समाज रत्न पुरस्कार जाहीर

### कराड येथे होणार शानदार कार्यक्रमात पुरस्कार प्रधान

इस्लामपूर : हॅलो प्रभात



ऊरूण ईश्वरपूर चे माजी नगराध्यक्ष अँड. राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे यांनी राज्यभर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त कराड येथील अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणीक विकास ट्रस्ट यांच्या वतीने राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार जाहिर झाला असुन हा शानदार पुरस्कार सोहळा रविवार, दिनांक १२.१०.२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता कराड येथील शिवाजी स्टेडियम समोरील वेणूताई चव्हाण सभाग्रह येथे हा पुरस्कार सन्मानपूर्व बहाल करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे संस्थापक, अध्यक्ष प्रविण काकडे यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळ्यास भारती विद्यापीठ पुणे उपाध्यक्ष, वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट चे विश्वस्त डॉ. इंद्रजित मोहिते, महिला महाविद्यालय कराड चे प्राचार्य. डॉ.भारत बल्लाळ, बारामतीचे ग्रामीण कथाकार रविंद्र कोकरे, मुंबईचे भुमि अभिलेख अधिकारी उल्लास वाघमोडे, य. मो. कृष्णा साखर करखान्याचे संचालक धोंडीराम जाधव, प्रा.साहेबराव चौरे, विश्वासराव मोरे, प्रा.डॉ.मच्छिंद्र गोफणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार जाहिर झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आ.देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सहायता निधी संकलन

शिराळा : नारायण घोडे पाटील



शिराळा विधानसभा मतदारसंघाचे आ.सत्यजित शिवाजीराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेले सर्व कार्यक्रम रद्द करून महाराष्ट्रात विविध भागांमध्ये अवकाळी पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितमुळे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी निधी संकलन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती माजी सभापती हणमंतराव पाटील यांनी दिली.

यावेळी बोलताना हनुमंतराव पाटील म्हणाले आमदार सतीश देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे शेतकरी वर्गाचे मोठे प्रमाणात यामधील नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये आमदार देशमुख यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेण्यात घेतला आहे.

वाढदिवसासाठी येणारा खर्च थांबून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जास्तीत जास्त निधी संकलन करून शासनाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी निधी संकलन करावा अशी आव्हान पाटील यांनी केले आहे.

### वाढदिवसानिमित्त आगळा वेगळा उपक्रम

आ.सत्यजित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार दि. ११ रोजी मतदारसंघातील प्रत्येक गावात सकाळी ८ ते १० या वेळेमध्ये सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता म्हणून राबवण्याचा निर्णय घेतला असून हा उपक्रम एकाच वेळी सर्वत्र राबवण्यात येणार आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने असा आगळावेगळा उपक्रम राबवण्यात येत आहे.

## शिवाजी विद्यापीठाला कुलगुरू जाहीर करा

### युवासेनेचे अनोखे आंदोलन : विद्यापीठ परिसरात मोकळी खुर्ची ठेवून निदर्शने

कोल्हापूर : हॅलो प्रभात



शिवाजी विद्यापीठ म्हणजे कोल्हापूरकरांचा मानबिंदू आणि विद्यार्थ्यांच्या अस्मितेचे प्रतीक आहे. मात्र विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कुलगुरूपद दीर्घकाळ रिक्त राहिल्याने ही विद्यार्थ्यांसाठी आणि या परिसरासाठी दुर्दैवाची बाब आहे, असे म्हणत आज युवा सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) तर्फे विद्यापीठ परिसरात अनोखे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोकळी खुर्ची ठेवून कुलगुरू नेमावा अशी मागणी करण्यात आली. विद्यापीठ प्रशासनाला निवेदन सादर करून लवकरात लवकर कुलगुरूची नियुक्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. हे निवेदन रजिस्ट्रार व्ही.येन. शिंदे यांना देण्यात आले.

या आंदोलनात युवासेना जिल्हा प्रमुख मंजित माने, जिल्हा चिटणीस चैतन्य देशपांडे, शहर प्रमुख सुमित मेळवंकी, युवतीसेनेच्या कृष्णा जाधव, उपजिल्हा प्रमुख सदाशिव पवार, अक्षय घाटगे, लतीफ शेख, शुभम पाटील, अक्षय मोरे, रमेश वरुटे, सारंग कांबळे, योगेश लोहार, इंजिमाम मुल्ला आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आर.आय.टी.च्या कौस्तुब गाडेकरची योग स्पर्धेसाठी निवड




इस्लामपूर : हॅलो प्रभात

गडहिंग्लज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत योग इंटर-झोनल स्पर्धेत आर.आय.टी. कॉलेज मधील विद्यार्थी कौस्तुब गाडेकर याने उल्लेखनीय कामगिरी करत चेन्नई येथे होणाऱ्या ऑल इंडिया योग स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे कौस्तुबचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. पी. व्ही. कडोले, डीन स्टुडंट डेव्हलपमेंट डॉ. एल. एम. जुगुलकर, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संग्रामसिंह पाटील, तसेच सिव्हील विभाग प्रमुख डॉ. पी. डी. कुंभार उपस्थित होते. डॉ. कडोले यांनी कौस्तुब तसेच प्रा. संग्रामसिंह पाटील यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महिला सबलीकरणासाठी महिलांनी स्वतः पुढाकार घ्यावा : डॉ.वंदना पाटील

कोतोली : हॅलो प्रभात



महिलांनी आपल्या मानसिकतेत बदल करून स्वतःच्या हक्कासाठी पुढे आले पाहिजे. समाजात प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविणे ही काळाची गरज आहे. अन्यायाविरुद्ध महिलांनी स्वतः आवाज उठवला नाही, तर त्यांना न्याय मिळणार नाही. महिलांनी स्वावलंबनासाठी उद्योगधंदे उभारले पाहिजेत. महिला कमावत्या झाल्या तर त्या आपल्या कुटुंबाचा भार सहजपणे पेलू शकतात, ज्यामुळे खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण घडते, असे प्रतिपादन हिंदी विभाग प्रमुख डॉ. वंदना पाटील यांनी केले. श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोलीयेथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिला सबलीकरण' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी त्या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.एस.एस. कुरलीकर (प्रमुख,समाजशास्त्र विभाग) यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रा. डी. एच. नाईक यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निरोगी जीवनासाठी महिलांचे मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे : डॉ.कांचन जोशी

सांगली : हॅलो प्रभात



महिलांचे मानसिक व शारीरिक आरोग्य महत्त्वाचे आहे. त्याचा वैयक्तिक व व्यवसायिक जीवनावर परिणाम होतो. त्यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्याच्या बाबतीत विद्यार्थिनींनी दक्ष असावे, असे आवाहन डॉ. कांचन जोशी यांनी विद्यार्थिनींना केले लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांसाठी शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची वर्तमानातील अपरिहार्यता' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षा वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षा श्रीमती स्मिता केळकर होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात महिलांना शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांनी केले. महिलांचे मानसिक आरोग्य सक्षम केल्याने त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील, याबद्दल मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. नंदिनी काळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रथम सत्रात डॉ. आरती शहा यांनी महिलांच्या स्वास्थ्यासाठी आहार नियोजनाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. सकस आहाराचे महत्व समजावून सांगितले. द्वितीय सत्रात प्रमुख वक्ते बाबासाहेब कनप यांनी महिलांच्या स्वास्थ्यासाठी योगाभ्यास, प्रात्यक्षिक व मूल्यमापन या विषयावर मार्गदर्शन करून प्राणायाम, सूर्यनमस्कार विविध आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्या डॉ. नंदिनी काळे, डॉ. धनश्री देशपांडे, डॉ. वैशाली जोशी यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोहिणी देशपांडे यांनी तर आभार कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. उर्मिला क्षीरसागर यांनी मानले यावेळी बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्राच्या प्रतिनिधी सोनल देवकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संस्थेच्या उपाध्यक्ष स्मिताताई केळकर यांच्या हस्ते गृहशास्त्र विभागाच्या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# अभिजात भाषेचा दर्जा हा मराठी भाषेचा गौरव

**डॉ.अनिता आंबोकर**

**शिराळा : नारायण घोडे पाटील**




भारत हा विविध भाषांचा, बोलींचा आणि संस्कृतींचा संगम आहे. प्रत्येक भाषेला तिचा स्वतःचा समृद्ध परंपरागत वारसा, साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक दृष्टीकोन आहे. या संदर्भात मराठी भाषा ही केवळ दैनंदिन संवादाची साधने राहिलेली नसून ती एक व्यापक सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि बौद्धिक परंपरेचे प्रतीक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र शासन, मराठी अभ्यासक व विविध संघटनांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. संत, पंत, तंत साहित्याची समृद्ध परंपरा मराठी भाषेला लाभली आहे. शिला-लेख, ताम्रपाटाच्या माध्यमातून मराठी भाषेचे अनेक पुरावे मिळतात. १९व्या शतकापासून लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा ज्योतीबा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषण-लेखनातून मराठीची विचारप्रवर्तक बाजू दिसून येते. यामुळे मराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा मराठी भाषेचा गौरव असे प्रतिपादन श्रीमती आ. रा. पाटील कन्या कॉलेज, इचलकरंजीच्या मराठी विभागप्रमुख डॉ. अनिता आंबोकर यांनी केले. त्या अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्सव समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर आणि मराठी विभाग, श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताह विशेष व्याख्यानात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख डॉ. सुनील बेंद्रे हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. स्वप्निल बुचडे यांनी करून दिला. आभार आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. अजय पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. सतीश कोले-पाटील यांनी केले.



## कला अकादमीचा कोजागिरी महोत्सव थाटात संपन्न

**विटा : हॅलो प्रभात**

येथील कला अकादमीचा विटे शहरातील सांस्कृतिक उत्सव ठरलेला कोजागिरी महोत्सव विटेकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यावर्षीच्या कार्यक्रमात वैद्यकीय व्यवसायात पारंगत असणाऱ्या अनेक डॉक्टरांच्या जबरदस्त अदाकारीने रंगतदार ठरला.नेटके नियोजन, दर्जेदार सादरीकरण, गाण्यांची उत्कृष्ट निवड आणि सादरीकरणातले वैविध्य व कोजागिरीचे स्वादिष्ट मसाले दूध यामुळे हा बहारदार कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरला.जुनी-नवी,मराठी आणि हिंदी गाणी,अप्रतिम संगीत साथ आणि साऊंड सिस्टिम,बहारदार रंगमंच व्यवस्था,विविध अंगी केलेले चुटकदार युगल निवेदन यांनी कार्यक्रमाची उंची नेहमीपेक्षाही वाढवली अशा प्रतिक्रिया रसिक वर्गाने व्यक्त केल्या.एकापेक्षा एक सुंदर गीते स्थानिक कलाकारांनी सादर केली. विट्यातील गान कोकिळा विभावरी फिरमे, अष्टपैलू गायिका प्रज्ञा सावंत,अनुभवी गायक

डॉ. शशिकांत भिसे, दमदार गायक,मानाजी कदम,प्रताप वलेकर,जयदेव बर्वे,डॉ.नीता देशपांडे, सुशांत वलेकर,डॉ. हणमंत जाधव,संभाजी पाटील,डॉ. उमेश पुजारी,नवोदित गायक सुयश शहा, सुजित चव्हाण यांनी रसिक प्रेक्षकांना शेवटपर्यंत खेळवून ठेवले. माऊली गायकवाड, आर्या शहा व आराध्या मनियार,आराध्या पुजारी, श्रद्धा पाडळकर आणि शितल एरोबिक्स अँड योगा स्टुडिओ ग्रुप,कला विकास मंडळ ग्रुप यांनी नृत्याचे विविध प्रकार सादर करून रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपाचे राज्य परिषद सदस्य,माजी नगरसेवक अनिल म. बाबर यांच्याहस्ते झाले.त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना कला अकादमीच्या या सातत्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही असेच सहकार्य करण्याची ग्वाही दिली. अकादमीचे संस्थापक डॉक्टर मानाजी कदम यांनी स्वागत प्रास्ताविक केले, शैला बाबर आणि गजानन बाबर,अनिल पवार आणि डॉक्टर स्वाती शिंदे-पवार, उत्तम कांबळे यांनी संवादात्मक अभिनयाने, विनोदी ढंगात सूत्र निवेदन केले. यावेळी जयंत बर्वे ,माजी नगर-सेवक उत्तमराव चोथे,निवृत्त कृषी अधिकारी संभाजी सावंत,ॲड.महेश शानबाग,राजेंद्र गायकवाड, राजाराम रोकडे,प्रा.रवींद्र पाडळकर, ,वैभव म्हेत्रे ,डॉ नंदा पाटील, डॉ. सुरेश पाटील, अशोक कदम, बाळासाहेब जाधव,ॲड. शाहीन तारळेकर उपस्थित होते. सचिव गजानन बाबर,खजिनदार गिरीश शरणाथे,उपाध्यक्ष स्वाती शिंदे पवार,डॉ.राजा ठोके,रघुराज मेटकरी,संभाजी पाटील,विनिता धमके,विजय पाटील,अरुण शहा,शहाजी धेंडे ,सोहिल होनवाड आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. डॉ. गिरीश शरनाथे यांनी आभार मानले.

## शरद इंजिनिअरिंगमध्ये 'इम्पेटस २के२५' टेक्निकल स्पर्धा

### १३ ऑक्टोंबरला राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा

**यड्राव : हॅलो प्रभात**

येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये सोमवार (ता.१३) ऑक्टोंबर रोजी 'इम्पेटस २के२५' या राष्ट्रीय स्तरावरील टेक्निकल स्पर्धेचे आयोजन केले आहे. शरद इन्स्टिट्युट व आयआयसी, इशरे, आय.एस.टी.ई., नवी दिल्ली अंतर्गत स्टुडंट चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन केले आहे. यामध्ये पेपर प्रेझेन्टेशन, प्रोजेक्ट कॉम्पेटिशन, रोबो रेस यासह २५ स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना संस्थेमार्फत प्रमाणपत्रसह अडिच लाख रूपयांपेक्षा अधिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. संस्थेचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे प्रमुख उपस्थीत आहेत.

या स्पर्धेच्या माध्यमातून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व अभ्यासाबरोबर तांत्रिक व प्रात्यक्षिक ज्ञान अवगत व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे सर्व नियोजन प्र. प्राचार्य डॉ. बी. बी. संगमे यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक प्रा. पी. के. कर्वे यांच्यासह प्रा.डॉ. एस. व्ही. कुंभार, प्रा.सौ. व्ही. ए. जुजारे, प्रा. एस.ए. मुळे, प्रा. के. ए. नदाफ, प्रा. के.एम. मुजुमदार, प्रा. पी.एम. स्वामी, प्रा. एस.के. शिकलगार, प्रा. एम.एस. जुगळे, प्रा.सौ. ए.ए. झळके व विद्यार्थ्यांनी केले आहे.

## तासगावातील घरफोडी प्रकरणी चौघे जेरबंद

### दीड लाखांचा मुद्देमाल जप्त; एलसीबीची कारवाई

**सांगली : हॅलो प्रभात**



तासगाव शहरासह परिसरात घरफोडी, चोरी आणि तांब्याच्या तारा चोरणाऱ्या चौघांना सांगली स्थानिक गुन्हे शाखेनेअटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दुचाकीसह दागिने आणि तांब्याच्या तारा मिळून दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याबाबत बारक्या चौधरी (३२), अनिल जाधव (२८), दिपक बिलारे (५१) आणि संतोष जाधव (२४), सर्व रा. बेघर वसाहत, इंदिरानगर, तासगाव. यांना अटक कण्यात आली आहे. तासगाव पोलीस ठाण्यातील चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी एलसीबीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली. पथकाला माहिती मिळाल्यानुसार, हे चोरटे चोरीतील दागिने आणि तांब्याच्या तारा विक्रीसाठी कवलापूर विमानतळ परिसरात येणार होते.

पोलिसांनी सापळा रचून चौघांना ताब्यात घेतले. चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून दुचाकी, दागिने, तांब्याच्या तारा आणि रोकड असा एकूण १.५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत संदीप नलावडे, सतिश माने, मच्छिंद्र बर्डे, सागर लवटे, नागेश खरात, अमिरशा फकीर, संदीप नागणे, केरूबा चव्हाण, विक्रम खोत, गणेश शिंदे तसेच सायबर पोलिस ठाण्याचे अभिजीत पाटील आणि अजय पाटील यांनी सहभाग घेतला. अटक केलेल्या आरोपींना पुढील चौकशीसाठी तासगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## कौशल्य विकास कोर्सचा तरुण-तरुणींनी लाभ घ्यावा

### आ.सुधीर गाडगीळ; सांगलीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट

**सांगली : हॅलो प्रभात**



शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये तरुण-तरुणींना उत्तम औद्योगिक प्रशिक्षण दिले जात आहे. त्याशिवाय आता शासनाने अल्पमुदतीचे कौशल्य विकास अभ्यासक्रमही सुरू केले आहेत. त्यांचा तरुण-तरुणीने लाभ घ्यावा, असे आवाहन आ.सुधीर गाडगीळ यांनी केले.

सांगलीतील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आ. गाडगीळ यांनी भेट दिली. तेथील सर्व कार्यशाळामध्ये सुरू असलेल्या कामकाजाची आणि दिल्या जात असलेल्या प्रशिक्षणाची त्यांनी माहिती घेतली. प्राचार्य मेघना जोशी आणि उपस्थित निदेशक व प्रशिक्षकांच्या बरोबर त्यांनी चर्चा केली. विद्यार्थ्यांबरोबरही संवाद साधला.

आ. गाडगीळ म्हणाले, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तरुण-तरुणींना उद्योग व्यवसायामध्ये चांगल्या संधी मिळाव्यात यासाठी विविध अभ्यासक्रमांचे (कोर्सेस) उत्तम प्रशिक्षण दिले जाते.

मात्र आता विद्यार्थ्यांना अधिक प्रशिक्षणाची संधी मिळावी, त्यांच्या रोजगार मिळवण्याच्या क्षमतेत वाढ व्हावी. कौशल्याचा विकास व्हावा आणि त्यांनी आत्मनिर्भर होऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करावा या दृष्टीने शासनाने आता अल्पमुदतीचे काही अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

आ. गाडगीळ यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील कार्यशाळांची पाहणी केली. कार्यशाळात उपलब्ध यंत्रसामग्री, उपकरणे यांचीही माहिती घेतली. प्राचार्य जोशी, तसेच गटनिदेशक एस. के. गोसावी व्ही एस. पाटील, एम. ए.पाटील, प्रकाश पत्की, शिल्प निदेशक सुदाम पाटील, एन. ए. शिंदे,कार्यालय अधीक्षक आर.व्ही. माळी,एन. डी. पाटील यांच्याबरोबर आमदार गाडगीळ चर्चा केली. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये काही यंत्रसामग्री तसेच उपकरणे यांची आणखी आवश्यकता असेल तर त्या संदर्भातील प्रस्तावही घ्यावा असेही त्यांनी सुचवले.



## शौर्य पवार स्विमिंगमध्ये राज्यात दुसरा

**नातेपुते : हॅलो प्रभात**

१७ वी राज्यस्तरीय पेरा स्विमिंग चॅम्पियनशिप छत्रपती संभाजीनगर येथे ५ ऑक्टोबर रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली. या स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील गुरसाळे येथील शौर्य सतीश पवार यांनी पन्नास मीटर फ्रीस्टाइल गटात राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या सन्मानार्थ छत्रपती संभाजीनगरच्या महापौरांनी त्यांना मेडल प्रदान करून गौरव केले. गुरसाळे गाव व आसपासच्या परिसरातून शौर्यासाठी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.शौर्यच्या आत्मविश्वासामध्ये 'आर्ट ऑफ लिव्हिंग' यांच्या वाय एल टी पी कोर्समुळे मोठा वाढ झाल्याचे त्याच्या आई, रुपाली पवार व वडील, सतीश पवार यांनी नमूद केले. या दृष्टीने त्याला या कोर्सचा मोठा फायदा झाला आहे. त्याचा राष्ट्रीय पातळीवरही निवड झाल्याचे आनंदाचे वृत्त आहे. शौर्यला स्विमिंगमध्ये प्रशिक्षित करण्यासाठी बर्गे सर, तावरे सर, पुरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्कृती मोरे, मुख्य कार्यकारी क्रीडा अधिकारी, सातारा आणि स्वप्नील पाटील, मुख्य कार्यकारी क्रीडा अधिकारी, बालेवाडी पुणे यांनी देखील त्याला हातभार दिला.शौर्यच्या या यशाने तेवढ्या नव्हे तर संपूर्ण गावाचा मान वाढविला आहे.




## रोटरी सेंट्रलच्या वतीने शिक्षकांचा सन्मान

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रलच्या वतीने टीचर्स एक्सलन्स अवॉर्ड देऊन शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते आणि क्लबचे अध्यक्ष अभिजीत भोसले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. एखाद्या राष्ट्राची प्रगती होण्यासाठी अनेक घटकांचा सहभाग असणे गरजेचे असते. त्यामध्ये भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे ठरते , असे प्रतिपादन डॉ. शिंदे यांनी केले.

यावेळी डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजीचे मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. सुनील रायकर, जिल्हा परिषद कावळटेक विद्यामंदिर शाळेचे शिक्षक जीवन मिठारी, सेवानिवृत्त शिक्षिका सुधाताई कुलकर्णी, कलाशिक्षक मिलिंद यादव, राधानगरी तालुक्यातील विद्या मंदिर कासारवाडा शाळेतील शिक्षक सुनिल कुदळे आणि प्रा. जयंती गायकवाड यांना गौरविण्यात आले.

अध्यक्ष अभिजित भोसले यांनी क्लबच्या उपक्रमांचा आढावा घेतला. प्रास्ताविक उपक्रमाचे समन्वयक प्राचार्य डॉ. महादेव नरके यांनी केले. सूत्रसंचालन संदीप साळोखे यांनी केले. यावेळी सचिव निलेश पाटील, खजानिस संग्राम शेवरे यांच्यासह रोटेरीयन उपस्थित होते.

## इस्लामपूर नगरपालिकेच्या रिंगणात मुस्लिम युवक उतरणार

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**










जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीला गती आली आहे. राज्याच्या २४७ नगरपालिका नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाले. इस्लामपूर नगरपालिका नगराध्यक्ष पद हे ओबीसी पुरुषसाठी राखीव आरक्षण जाहीर झाले. इच्छुकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारतीय जनता पार्टी कडून चिमण डांगे, विश्वनाथ डांगे, विजय कुंभार, गजानन फल्ले यांचे नाव चर्चेत येऊ लागले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्याकडून संजय कोरे यांच्या नावाची चर्चा आहे. शिवसेनेने तर तालुकाप्रमुख सागर मलगुंडे यांचे नाव जाहीर केले. काही नेत्यांनी तर फटाक्याची आतिषबाजी करून आपण रिंगणात उतरणार आहे असे जणू संकेत दिले. परंतु आमदार सदाभाऊ खोत, राहुलदादा महाडिक, भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडिक, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष निशिकांतदादा पाटील, जिल्हा समन्वयक गौरव नायकवडी, जिल्हाप्रमुख आनंदराव पवार, विक्रमभाऊ पाटील, वैभव पवार हे कुणाला पसंती देतात त्यांच्या गळ्यात नगराध्यक्ष पदाची माळ पडणार हे मात्र नक्की.

दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाकडून सध्यातरी ७ वेळा नगरसेवक राहिलेले आनंदराव मलगुंडे यांचे नाव आघाडीवर आहे. आमदार जयंत पाटील यांचे ते निकटवर्तीय मानले जातात.

शहरातील मुस्लिम युवकांनी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून शहरांमध्ये निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे संकेत दिले. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक उपक्रम, मुस्लिम समाजासाठी निधी, कवाली कार्यक्रम, महिला मेळावा अशा माध्यमातून नगरपालिकेच्या रिंगणामध्ये उतरण्याचे संकेत दिले. मुस्लिम समाजामधून माजी नगरसेवक पीरअली पुणेकर, शकील सय्यद, आयुब हवलदार, बशीर मुल्ला, शाकीर तांबोळी, जलाल मुल्ला, मन्सूर वाठारकर हे इच्छुक असल्याची चर्चा आहे. तर मुस्लिम युवकांमध्ये शिवसेनेकडून अमीर हवलदार, रयत क्रांती कडून सरफराज डाके व मोहसीन पटवेकर ,भाजप कडून मकसूद भादी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून फिरोज पटेल व मुतसीर पटेल काँग्रेस कडून बालम मोमीन, राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार गटाकडून वसीम मुल्ला, जुबेर खाटीक, अतिक मनेर, उबाठा कडून फजल हवलदार हे इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. या सर्व युवकांनी अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपली ताकद दाखवली आहे.

कवाली कार्यक्रम व महिला मेळावा निमित्त साधून गौरव नायकवडी यांचे निकटवर्तीय शिवसेनेचे अमीर हवलदार यांनी शक्तिप्रदर्शन केले.शहरात ते अग्रेसर शिवसैनिक म्हणून त्यांनी शहरांमध्ये आपली छाप उठवली आहे. एका कार्यक्रमांमध्ये गौरव नायकवडी यांनी त्यांची उमेदवारी जाहीर केली. रयत क्रांती इस्लामपूर कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार सदाभाऊ खोत यांनी मोहसीन पटवेकर व सरफराज डाके यांची उमेदवारी जाहीर केली होती. मकसूद भादी, बालम मोमीन, मोहसीन पटवेकर, अमीर हवलदार, सरफराज डाके, जुबेर खाटीक, वसीम मुल्ला, अतिक मनेर, फजल हवलदार, फिरोज पटेल, मुतसिर पटेल हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. परंतु दोन्ही गटातील वरिष्ठ नेते काय निर्णय घेणार याकडे आता मुस्लिम समाजाचे लक्ष लागून राहिले आहे.



## भारत-ब्रिटन भागीदारी आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार

### प्रधानमंत्री मोदी; व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण, संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे आज त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी बोलत होते. प्रधानमंत्री मोदी म्हणाले, यावर्षी जुलै महिन्यात माझ्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारावर सहमती दर्शविली. या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. ब्रिटनचे पंतप्रधान आणि त्यांच्यासोबत आलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधी मंडळ ही भागीदारीतील नव्या ऊर्जेचे द्योतक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे भारताचा वेग अधोरेखित : प्रधानमंत्री मोदी

## पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक; विकसित भारताच्या दिशेने मजबूत पाऊल

**नवी मुंबई : हॅलो प्रभात**

आजचा दिवस केवळ प्रकल्पांच्या उद्घाटनाचा नव्हे, तर भारताच्या झपाट्याने होत असलेल्या परिवर्तनाचे आणि प्रगतीच्या दिशेने घेतलेल्या ठोस पावलांचे प्रतीक आहे. मुंबईतील विविध प्रकल्पांमुळे देशाचा वेग आणि विकास अधोरेखित झाला आहे. पायाभूत सुविधांतील गुंतवणूक, तरुणांसाठी रोजगार संधी हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेले मजबूत पाऊल असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन, मुंबई मेट्रो लाईन-३ च्या आचार्य अत्रे चौक ते कफ परेड या अंतिम टप्प्याचे राष्ट्राला अर्पण, 'मुंबई वन'या देशातील पहिल्या एकात्मिक कॉमन मोबिलिटी ॲपचा शुभारंभ तसेच राज्यातील ४१९ आयटीआय आणि १४१ तांत्रिक संस्थांमध्ये २ हजार ५०६ बॅचेसच्या माध्यमातून नवीन अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमाचा शुभारंभ झाला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, जपानचे भारतातील राजदूत ओनू केईची, वन मंत्री गणेश नाईक, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, लोकसभा सदस्य श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, खासदार नरेश म्हस्के, खासदार धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री रवींद्र चव्हाण, अमित साटम, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विक्रांत पाटील, मंदाताई म्हात्रे, अदानी ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी यांच्यासह लोकप्रतिनिधी व विविध मान्यवर उपस्थित होते.

## शासनाचे १६ वर्षे मुदतीचे १,५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र शासनाच्या १६ वर्षे मुदतीच्या १,५०० कोटींच्या (७.२६ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४१) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाच्या बोली १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर कराव्यात. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११ पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येते.

## 'एनएचएम' कर्मचाऱ्यांना १५ टक्के मानधन वाढ

### आरोग्यमंत्री आबिटकर

**मुंबई : हॅलो प्रभात**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के इतकी मानधन वाढ देण्यात येणार आहे. याबाबत शासन मान्यता देण्यात आली असुन, राज्यभरातील पन्नास हजार (५००००) कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



सार्वजनिक आरोग्य विभागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम.) अंतर्गत विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची मानधन वाढीची मागणी होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने १५ टक्के मानधन वाढ देण्याचा निर्णय केला आहे.

आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्यांबाबतही शासन सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी सांगितले. १० वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना इएसआयएस अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे, कर्मचाऱ्यांसाठी गंभीर आजार, अपंगत्व, मृत्यू अशा संकटात आर्थिक सहाय्य देण्यासाठी एनएचएम कर्मचारी कल्याण निधी उभारणे, अति दुर्गम व नक्षलग्रस्त भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करणे, यासह इतर मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, याबाबत कार्यवाही सुरू आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आणि आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी व्यक्त केला आहे.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उपकेंद्र स्थापण्यासाठी समिती नेमावी

### मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**मुंबई : हॅलो प्रभात**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमावी. या समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा, असे निर्देश सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बैठक झाली. राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार रणधीर सावरकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे



प्र-कुलगुरू, विद्यापीठाचे रजिस्ट्रार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. येथील कलाकृती पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहाव्यात, याकरिता आधुनिक सुविधांसह आर्ट म्युझियम उभारावे. यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालयाच्या समृद्ध कलावैभवाचे जतन, संवर्धन आणि प्रदर्शनासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आर्ट गॅलरी उभारण्याच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या गॅलरीत संस्थेतील ऐतिहासिक व दुर्मिळ कलाकृतींचे डिजिटल दस्तऐवजीकरण, विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अभ्यासासाठी खुले प्रदर्शन विभाग, तसेच आधुनिक कलाप्रदर्शनासाठी स्वतंत्र दालन उभारण्याबाबतही चर्चा झाली. बैठकीस तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे प्राचार्य राजीव मिश्रा, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु करावी : मंत्री डॉ. भोयर

**मुंबई : हॅलो प्रभात**

शालेय शिक्षण विभागाने वर्धा, गोंदिया, भंडारा जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या गट - अ, ब, आणि गट - क दर्जाच्या रिक्त पदांवर पात्र उमेदवारांच्या भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. वर्धा, गोंदिया, भंडारा जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या गट - अ, ब, आणि गट - क दर्जाच्या रिक्त पदांसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक झाली.



यावेळी नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी वर्धा, गोंदिया, भंडारा जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या गट - अ, ब, आणि गट - क दर्जाच्या रिक्त पदांचा सविस्तर आढावा घेतला. या जिल्ह्यातील सर्व रिक्त पदांची भरती प्रक्रिया शालेय शिक्षण विभागाने तातडीने राबवण्याचे निर्देश भोयर यांनी

## शालेय स्तरावर एनसीसी प्रशिक्षणाची अंमलबजावणी करावी




### मंत्री माणिकराव कोकाटे

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, निरोगीपणा आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत यासाठी शालेय स्तरावर राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), स्काऊट आणि गाईड संदर्भातील बैठकीत क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. कोकाटे यांनी ही भूमिका मांडली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शालेय स्तरावर एनसीसी प्रशिक्षण सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाला प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावना, शिस्त आणि क्रीडाप्रेम अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी आयुक्त शितल तेली, एनसीसीचे कॅप्टन जे. जॉर्ज, सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित, शिक्षण उपसंचालक डॉ. वंदना वाहूळ, शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव अनिरुद्ध कुलकर्णी उपस्थित होते. मंत्री कोकाटे म्हणाले की, माजी सैनिक, एनसीसीचे विद्यार्थी आणि क्रीडा शिक्षकांच्या मदतीने शाळेतील शिक्षकांना क्रीडा आणि कवायतीचे प्रशिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच शारीरिक स्वास्थ्य, स्वयंशिस्त आणि प्रगल्भ विचार निर्माण होण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांना मैदानी खेळाची आवड निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावर सक्तीचे क्रीडा प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. भविष्यात ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी विविध खेळांचे प्रशिक्षण देण्याचे धोरण तयार करावे. तसेच, क्रीडा शिक्षकांची संख्या वाढविण्यासाठी आणि क्रीडा स्पर्धांतील विजेत्या खेळाडूंना शिक्षक म्हणून नियुक्तीत विशेष सवलत देण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, असेही त्यांनी सांगितले.

## महाराष्ट्र दसरा भव्यतम सोडत जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य लॉटरी, महाराष्ट्र शासनच्या वतीने दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ४.00 वाजता सोडत सभागृह उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचे कार्यालय टी ब्लॉक, पहिला मजला, दाणा बाजार, एपीएमसी मार्केट, सेक्टर १९.बी. वाशी, नवी मुंबई -४००७०५ या ठिकाणी महाराष्ट्र दसरा भव्यतम सोडत काढण्यात आली. या सोडतीमधून जनतेच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी या ब्रिदवाक्याचा पुरेपुर अवलंब करण्यात आला. या सोडतीचे वैशिष्ट्य म्हणजे पहिले (सामायिक) बक्षिस तिकीट क्रमांक DB-०२ २५५९७ रूपये ५०,००,०००/-चे एक बक्षिस अग्रवाल लॉटरी एजन्सी, धुळे येथील खरेदीदारास लागले आहे. रक्कम रू.१,००,०००/-ची २ बक्षिसे व रू. १००००/- च्या आतील रकमेची २९७० बक्षिसे लागली आहेत, असे एकूण सर्व बक्षिसांची रक्कम रू. ६५,८०,५००/- इतकी होती.सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम रू. १०,०००/- वरील बक्षिसाची मागणी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रु. १०,०००/- च्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा, महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी कळविले आहे.

## शाळांमध्ये मराठी भाषा राज्यगीत गायन अनिवार्य : मंत्री दादाजी भुसे

### सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य यांची बैठक

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्य शिक्षण मंडळासह अन्य सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन अनिवार्य असून राज्यगीत गायन सुद्धा केले जावे, अशी सूचना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केली.राज्यातील सर्व शिक्षण मंडळाच्या समन्वयक, प्राचार्य आणि शिक्षण विभागाचे अधिकारी यांची सहविचार बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी शालेय शिक्षण मंत्री भुसे बोलत होते. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ यांच्यासह सीबीएसई, आयसीएसई, इंटरनॅशनल बोर्डाचे विविध समन्वयक व शाळांचे प्राचार्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, आयसीएसई, सीबीएसई, केंब्रिज मंडळातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या दहावीच्या गुणपत्रिकेवरसुद्धा मराठी हा विषय आला पाहिजे. त्यासाठी विविध मंडळांशी पत्रव्यवहार केला जाईल.

राज्य मंडळाप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यासंदर्भातील अभ्यासक्रमाचा आयसीएसई बोर्डाच्या पुस्तकामध्येही समावेश झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# सैनिकी शिक्षण देण्याची प्रक्रिया गतिमान करावी

### मंत्री दादाजी भुसे

**मुंबई : हॅलो प्रभात**

'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण देणे शक्य आहे. प्रशासनाने याबाबतची प्रक्रिया गतिमान करावी, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत माजी सैनिकांमार्फत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहूल रेखावार, सैनिक कल्याण विभागाचे संचालक कर्नल दीपक ठोंगे, सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव गणेश पवार, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेचे सहसचिव गोविंद कांबळे, अवर सचिव अनिरुद्ध कुलकर्णी आदी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शालेय वेळापत्रक विचारात घेऊन 'आनंददायी शनिवार' अंतर्गत सैनिकी शिक्षण देण्याबाबत नियोजन करण्यात यावे. तसेच आनंददायी शनिवार अंतर्गत योग, स्वसंरक्षणासाठी कराटे आदी बाबींचेही प्रशिक्षण दिले जावे.

६यासाठी कामकाजाचे दिवस, उपलब्ध तासिका विचारात घेतल्या जाव्यात. शालेय शिक्षण विभाग आणि माजी सैनिक कल्याण विभाग यांच्या समन्वयाने सैनिकी शिक्षण देण्याबाबतच्या उपक्रमाची शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देशही श्री. भुसे यांनी दिले.

